# भारतीय स्वातंत्र्यलढयातील नागपूर शहरातील महिलांचे कार्य – एक अध्ययन

प्रा. राजु भा. खरडे
राजेंद्रसिंह उर्फ बाबा व्यास , कला व वाणिज्य महाविद्यालय, कोंढाळी.



**प्रस्तावना**

स्त्री आणि पुरूष समाजरूपी रथाची दोन चाके असून, स्त्री आणि पुरूषांच्या सहकार्याशिवाय समाजाचा, राष्ट्राचा विकास शक्य नाही. त्याचप्रकारे स्वातंत्र्यलढा स्त्री पुरूषांच्या सहकार्याशिवाय शक्य नाही, परंतु स्वातंत्र्यलढयातील स्त्रियांच्या कार्याकडे गांर्भियाने पाहिले गेले नाही. स्त्रीयांच्या भारतीय स्वातंत्र्यलढयातील योगदानावर फारसे लिखान सुध्दा झाले नाही. स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासात स्त्रीयांची उपेक्षा झाल्याचे दिसून येते, त्याचे कारण कदाचित पुरूष प्रधान संस्कृतीत स्त्रीयांच्या कार्याकडे पाहण्याचा गौण दृष्टीकोन असावा. भारतीय महिलांनी स्वातंत्र्यलढयात पुरूषांच्या खांदयाला खांदा लावून स्वातंत्र्यलढयात योगदान दिले. भारतीय इतिहासातील उपेक्षीत स्त्री कर्तुत्वाप्रमाणे स्त्रीयांचे स्वातंत्र्यलढयातील योगदानही उपेक्षीत ठेवण्यात आले आहे. केवळ नागपूरमधीलच नव्हे तर संपूर्ण भारत देशातील स्त्रीया पुरूषांच्या खांदयाला खांदा लावून स्वातंत्र्यलढयात लढल्या. याची इतिहासाने म्हणावी तशी दखल घेतली नाही. म्हणूनच या शोध निबंधात नागपूर शहरातील महिलांच्या कार्यावर प्रकाश टाकण्यासाठी या विषयाची निवड केली आहे.

ब्रिटीश राजवटीमुळे भारतीयांचा आधुनिक जिवन मुल्यांशी, पाश्चात्य शिक्षण पध्दतीशी संबंध आला. भारतीय समाजात सुधारणा व्हाव्या म्हणून अनेक समाज सुधारकांनी प्रयत्न केले, त्याचा निश्चित फायदा झाला. समाज जागृत होवून अनिष्ट चालिरितींना काही प्रमाणात का होईना, पायबंद बसला. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या कार्यामुळे स्त्री शिक्षणाची सुरूवात होवून, पुढे अनेकांनी स्त्री शिक्षीत व्हावी म्हणून प्रयत्न करताच, स्त्री शिक्षणाचा विकास घडून आला. स्त्री शिक्षणामुळे स्त्रीयांमध्ये नवे विचार रूजु लागले. स्त्रीया सार्वजनिक जिवनात पुढेयेवू लागल्या. 1885 मध्ये स्वातंत्र्य प्राप्तीसाठी कॉंग्रेसची स्थापना झाली. कॉंग्रेसचा व तात्कालीन पुढाऱ्यांचा प्रभाव सुशिक्षीत स्त्रीयांवर पडु लागला लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यांच्या कार्याने प्रभावीत होवून भारतातील स्त्रीयांनी भारतीय स्वातंत्र्यलढयाच्या सर्व चळवळीमध्ये उत्सफुर्तपणे भाग घेतला.

नागपूर जिल्हयाचे भारतीय स्वातंत्र्यलढयातील स्थान अतिशय महत्वाचे आहे. नागपूर मधिल स्त्रीयांचा लोकमान्य टिळक व महात्मा गांधींच्या चळवळीत मोठया प्रमाणात महिलांचा सहभाग होता. प्रबोधनातून लोकजागृती केली, स्वातंत्र्य चळवळीत पुरूषांच्या बरोबरीने उत्सफुर्तपणे सहभाग घेतला. अन्यायाविरूध्द झुंज दिली,क्रांतीकारकांना सहकार्य केले. त्या स्त्रिया भिन्नभिन्न वयोगटातील, जातीतील, धर्मातील असल्यातरी त्यांचे उद्दिष्ठ एकच होते, आणि ते म्हणजे राष्ट्रहित होय. नागपूर मधील स्त्रीयांना स्वातंत्र्य आंदोलनात सहभाग घेतल्यामुळे त्यांना शिक्षासुध्दा झाली, पण त्यांचा आंदोलनातील सहभागावर काहीही परिणाम झाला नाही. नागपूर मधिल स्त्रीयांनी होमरूल चळवळ, असहकार, सविनय कायदेभंग, वैयक्तिक सत्याग्रह, चलेजाव चळवळीत मोठया प्रमाणात भाग घेतला होता.

नागपूरला पहिली मुलींसाठी शाळा 1858 ला शुक्रवारी तलावाजवळ श्रीमती कपूर यांनी सुरू केली. 1878 मध्ये नागपूरला सिताबर्डी येथे भिडे कन्याशाळा, गोपाळराव भिडे यांनी मोरेश्वर पारधी यांच्या मदतीने सुरू केली. तर दादासाहेब आगलेयांनी महालमध्ये 1916 मध्ये 'हिंदु मुलींची शाळा' सुरू केली. 1914 ला नागपूरला सोनुताई सुळे, द्वारकाबाई प्रधान यांनी सुळे महिला विद्यालयाची स्थापना केली. त्यावेळी शिकविण्याकरीता शिक्षीका मिळत नव्हत्या ही उणिव सुळे कुटुंबातील स्त्रीयांनी पुढे येवून भरून काढली. 1936 मध्ये धंतोलीला मुलींचे वसतीगृह काढण्यात आले. किसन फागुजी बनसोड यांनी 1907 मध्ये चोखामेळा कन्याशाळा तर 1914 मध्ये मुलींसाठी वसतीगृह स्थापण केले. त्यांच्या या कार्यात जईबाई चौधरी व श्रीमती झुलाबाई यांनी मोलाचे सहकार्य केले. जईबाई चौधरी यांनी दलित समाजात सुधारणा करण्याच्या कार्याबरोबर 1920 मध्ये नागपूरच्या मंगळवारी भागात चोखामेळा कन्याशाळा सुरू केली. स्त्रीयांसाठी त्यांनी रात्रीचेवर्गही सुरू केले. अशाप्रकारे नागपूर शहरात मुलींना शिक्षण देणाऱ्या अनेक शाळा सुरू झाल्याने नागपूर शहरातील व आजूबाजुच्या परिसरातील मुली–स्त्रीयां मोठया प्रमाणात शिक्षण घेऊ लागल्या. त्यामुळे त्यांच्या कक्षा उंचावून त्यांच्या पाश्चात्य शिक्षणाबरोबर पाश्चात्य जिवनमुल्यांशी परिचय झाला. शैक्षणिक जागृतीबरोबर, राजकिय जागृती त्यांच्यात निर्माण झाल्याने त्यांनी भारतीय स्वातंत्र्यलढयात मोठया संख्येने भाग घेण्यास सुरूवात केली.1त्याततताराबाई शिंदे सर्वात पुढे होत्या. ताराबाई शिंदे यांनी सत्यशोधक समाजाचे कार्य करीत

असतांनाच 1882 मध्ये 'स्त्री–पुरूष तुलना' हा ग्रंथ लिहून ''त्यात, तत्कालीन समाजातील स्त्रीयांच्या दयनिय जिवनाबाबत अत्यंत परखड शब्दात अतिशय बुध्दीनिष्ठवृत्तीने विधाने केली आहेत.'' त्या म्हणतात पुरूषांचे धाडस व दगाबाजीची नित्य नवी भयंकर उदाहरणे दिसून येत असतांनाही तिकडे कुणीही लक्ष न देता स्त्रियांवर सर्व दोषांची गोणी लादतात हे पाहून माझे मन खळबळुन गेले. त्यामुळे निर्भिड होवून असे खडखडीत लिहल्यावाचुन मला राहावेना. ताराबाई शिंदे स्त्री सुधारनाबाबत क्रांतीकारी भूमिका परखडपणे मांडणाऱ्या विदर्भातील पहिल्या महिला होय.[2]

सामाजिक क्षेत्रात होऊ लागलेल्या वैचारीक परिवर्तनामुळे विदर्भातील स्त्री घराबाहेरच्या जगावर दृष्टीक्षेप टाकू लागली. त्यामुळे स्त्रीयात राजकीय जागृती वाढू लागली.[3] विदर्भात प्रथमच 1891 मध्ये नागपूरला कॉग्रेसचे अधिवेशन झाले, त्याला लोकमान्य टिळकही हजर होते. विदर्भासी टिळकांच्या पुढे जो निकटचा संबंध प्रस्थापित झाला, त्याची ही सुरूवात होती. या अधिवेशनाचा नागपूर मधिल स्त्रीयांवर निश्चितच परिणाम होवून त्यांच्यात राजकीय जागृती घडून येण्यास सुरूवात झाली. पुढे अमरावतीच्या 1897 च्या ''अधिवेशनाला नागपूरच्या तुलसीबाई भिष्म कॉग्रेस सदस्य म्हणून या अधिवेशनाला हजर होत्या.'' स्वदेशी व बहिष्काराचे वारे नागपूरलाही वाहू लागले. नागपूरच्या गंगुबाई कप्तान या महिलेने 1906 मध्ये बालगंधर्व नाटक टिळक बघायला गेले असता घरचा विरोध असूनही टिळकांची रंगमंचाच्या मागील भागी भेट घेतली.[4] तर लक्ष्मीबाई केळकर यांनी टिळकांची भाषणे ऐकली होती. त्यामुळे कमलाताईच्या मनावर राष्ट्रीय विचार बिंबला. त्यांनी व पुढे त्यांनी राष्ट्रकार्याला वाहून घेतले. लोकमान्य टिळकांच्या विचाराने प्रभावित होवून काही महिलांनी नागपूरला 1911 मध्ये 'लेडीज क्लब' या संस्थेची स्थापना केली. हि संस्था जवळपासच्या खेडयात सुधारणा पोहचविण्याचे कार्य करीत असत. त्यात श्रीमती पारेख, श्रीमती रमाबाई केदार, श्रीमती मलक व त्यांच्या सहकारी महिला होत्या. मथुराताई द्रविड आपल्या पतीच्या देशकार्यात उत्साहाने भाग घेत. त्यांनी 1915–16 च्यासुमारास एक महिला संघ स्थापन केला. हा संघ केसारीचे सामुहीक वाचन करीत असत. 1915 च्या नागपूरमधिल सभेत होमरूलची माहीती देण्यात आली होती. त्यावेळी या सभेत मथुराताई द्रविड, द्वारकाताई देउस्कर होत्या. त्यांनी स्त्री शिक्षणाच्या प्रसाराबाबत ठराव मांडला. आपल्या घरी लोकमान्य टिळकांना बोलावू शकत नाही. म्हणून पार्वतीबाई कप्तान यांनी निळकंठराव उधोजी त्यांच्या घरी भेट घेवून देशकार्यासाठी सोन्याच्या दागीण्याची एक पिशवी टिळकांना दिली.[5]

### *1920 चे नागपूरचे राष्ट्रीय कॉग्रेसचे अधिवेशन–*

डिसेबंर 1920 च्या नागपूर अधिवेशनाला अनेक स्त्रिया उपस्थित होत्या. त्यात नागपूरच्या चिटणविस, बुटी, किनखेडे इ. कुटुंबातील महीला उपस्थित होत्या. अनेक महिलांनी हया अधिवेशनाच्या वेळी स्वयंसेविकेचे कार्य केले. नागपूर अधिवेशनाचे अध्यक्ष जमनालाल यांच्या पत्नी जानकीदेवी बजाज राष्ट्रीय चळवळीत उतरताच इतर स्त्रियाही पुढे येवून प्रचार कार्यात सहभागी होवु लागल्या.[6] 1920 साली सुरू झालेल्या असहकार चळवळीत पुर्वीपेक्षा अधिक संख्येने महिलाही भाग घेवू लागल्या. स्वदेशी, विदेशी मालावर बहीष्कार, चरखा व खादीचा प्रसार इ. कार्यात स्त्रीया सहभागी होऊ लागल्या. राष्ट्रीय स्तरावरही महिला सहभागी होऊ लागल्या. त्याचा परिणाम नागपूरकर महिलांवर पडून पुढे महिलांनी निदर्शने, मोर्चे आणि निरोधने अशा कार्यात महिला सहभागी होऊ लागल्या. 29 जानेवारी 1921 राजी लक्ष्मीबाई परंजपे, श्रीमती चोळकर व त्यांच्या सहकारी महिलांनी मिळुन 'सरस्वती मंडळ' नावाची महिला संस्था स्थापन केली. हि संस्था स्वदेशीचा प्रचार करून विदेशी मालाचा बहिष्कार करीत असत. अशाप्रकारे नागपूर बरोबर भारतातील महिलांनी मोठया प्रमाणात असहकार चळवळीत भाग घेतला होता.[7]

### *नागपूरचाझोंडा सत्याग्रह –*

नागपूरला झालेल्या झेंडा सत्याग्रह भारतीय स्वातंत्र्यलढयातील एक महत्वाची घटना होय. 13 एप्रिलच्या जालियनवाला बाग हत्याकांडाच्या स्मृतीदिनी नागपूरात मिरवणूक काढली, 13 एप्रिलच्या घटनेनंतर नागपूरात अनेक जाहीर सभा घेण्यात आल्या. सुभद्राबाई चव्हाण यांनी अनेक जागी भाषणे दिली. महिलांना राजकीय कार्यासाठी प्रवृत्त करण्यास त्यांचा मोठा वाटा होता. त्यावेळी त्या केवळ 19 वर्षाच्या होत्या. स्त्रीयांना मिरवणुकीत सहभागीहोण्याची परवानगी नसतांना 31 मे 1923 रोजी सत्याग्रहाच्या वेळी सुभद्रादेवी एकटयाच पुढे आल्या, त्यांना अटक करण्यात आली. त्यामुळे हा सत्याग्रह आणखीनच तिव्र होत गेला. सत्याग्रहात स्त्रियांचा सहभाग वाढू लागला.[8] नागपूरला झेंडा सत्याग्रहाला मिळालेला जनतेचा उत्स्फुर्त प्रतिसाद पाहून कॉग्रेसने 18 जुलै हा झेंडादिन पाळण्याचे ठरविले. त्याचे नेतृत्व सरदार वल्लभभाई पटेलांकडे होते. 23 जुलैला टाऊन हॉलमध्ये झालेल्या सभेला वक्त्या म्हणून सुभद्राबाई, सावित्रीबाई उपस्थित होत्या.[9] झेंडा सत्याग्रहाचे वैशिष्ट म्हणजे नागपूरला झालेला पहिलाच अखिलभारतीय स्वरूपाचा सत्याग्रह होता. या चळवळीत मोठया प्रमाणात स्त्रिया प्रथमच संघटीतपणे राष्ट्रीय कार्य करण्यास बाहेर पडल्या होत्या. बंदीवासाची, पोलीसांची लढयाची भिती त्यांच्या मनात राहीली नव्हती. अनेक स्त्रीयांना अटक केली. तर काहींना अटक करून सोडुन देण्यात आले, तर काहींना शिक्षा ठोठावण्यात आल्या पार्वतीबाई पटवर्धन, चतुराबाई कोटक व सुभद्रादेवी यांना 3 महिन्याची शिक्षा झाली.[10]

नागपूरमधील सामान्य घराण्यातील तुळसाबाई गावंडे खादी वापरीत व खादीचा प्रचार करीत, खादी प्रचाराबरोबर मद्यपान बंदी व मासाहार बंदी करण्यावरही त्यांनी भर दिली. त्या तेली व कोष्टी समाजात राष्ट्रीय भावना जागृत करण्याचे कार्य करीत असे. नागपूर मधील अनसूयाबाई काळे यांचे सुरूवातीचे काही दिवस सामाजिक सुधारणा कार्यात गेले. भगिनी मंडळाच्या स्थापनेत त्यांचा मोलाचा वाटा होता. तसेच अखिल भारतीय महिला परिषदेच्या नागपूर शाखेचे अधिवेशन भरविण्याचा त्यांचा मोठा वाटा होता. स्त्री शिक्षणासाठी त्या झटत. ब्रिटीश सरकारने त्यांना मेनोनित केले असले तरी, सरकारी धोरणचा विरोध करण्यात त्या कधीच मागे राहील्या नाही, वेळप्रसंगी राजीनामा देण्याचीही त्यांची तयारी होती. नागपूरच्या कामगार चळवळीतीलही त्यांचे कार्य महत्वपूर्ण आहे. नागपूर मधिल 1929 च्या ट्रेड युनियन कॉग्रेसच्या अधिवेशनाच्या त्या स्वागत समितीच्या उपाध्यक्ष होत्या. तसेच कायदे कॉन्सीलात असतांना त्यांनी महिला कल्याणाचे काही ठराव पारीत करवून घेतले. 1930 मध्ये सविनय कायदेभंग आंदोलन सुरू होताच त्या आंदोलनात उतरल्या आणि पुढील काळात त्यांनी सातत्याने राष्ट्रीय कार्यात सहभाग घेतला.[11]

### सविनय कायदेभंग आंदोलनात नागपूर षहरातील महिलांचा सहभाग :

नागपूरच्या अनसूयाबाई काळे हयांच्या महिला गटाने स्वातंत्ररित्या वैद्यकिय आणि अभियांत्रिकी तसेच शेतकीसंस्था सोडून अन्य शैक्षणिक संस्थावर निरोधने करण्याचे ठरविले. विद्यार्थ्यांची इच्छा नसल्याने मधला मार्ग काढून 16 ते 19 चार दिवस हरताळ करण्याचे ठरविण्यात आले. अनेक विद्यार्थ्यांनी कॉलेजच्या वेळा व्यतिरीक्त इतर वेळेला दारू दुकानावर निरोधना करीता मदत करण्याचे मान्य केले. 500 महिलांची मिरवणूक सिताबर्डीहून निघुन ती शहरातील दारूच्या दुकानांवर गेली. त्याचदिवशी दुपारला 400 महिलांची सभा मुंबईच्या महिला स्वयंसेविकावर झालेल्या अत्याचारांविषयी निषेध व्यक्त करण्याकरीता झाली. या सभेत अनसूयाबाई काळे, इंदिराबाई नियोगी, विमलाताई अभ्यंकर यांची सभेमध्ये भाषणे झाली. 13 जुलै 1930 रोजी विद्यार्थ्यांच्या सभेत अनसूयाबाई काळे व अभ्यंकरांची मुलगी यांची भाषणे झाली. सायन्स कॉलेज, विधी महाविद्यालय, हिस्लॉप कॉलेज समोर निदर्शने करून वरील कॉलेज बंद करण्यात आली. याव्यतिरीक्त अनेक महाविद्यालयावर निरोधने करण्यात आली. ठिकठिकाणी विदेशी कापडाच्या होळया करण्यात आल्या. हयाचे सर्व श्रेय नागपूरमधिल महिलांना जाते. नागपूर शहरात दारूच्या दुकानावर निर्देशने करण्यात अनेक स्त्रिया सहभागी झाल्या होत्या. त्यातील समप्यारी धरमपाल, तुळसाबाई खंडेलवार आणि दुर्गारूपा हया महिलांना सहा महिन्याची सक्त मंजुरीची, तर गोपीकाबाई पटवर्धन, चंद्रभागाबाई पटवर्धन आणि लक्ष्मीबाई बोरकर हया महिलांना चार महिन्याची सक्त मंजुरीचा कारावास झाली.[12]

### नागपूरचा गढवाला दिन :

गढवाली सैनिकांना सहानूभूती दाखविण्याच्या निमित्ताने नागपूरमध्ये गढवाल दिन साजरा करण्यासाठी 9 ऑगस्ट 1930 ला 144 कलम रात्री बारा पर्यंत लागू असल्याने रात्री 12 नंतर चिटणिसपार्कला मिरवणूक काढण्यात आली. त्यात दुर्गाताई धनकर आपल्या मैत्रिणीसह सहभागी झाल्या होत्या.[13] अनसुयाबाई काळे यांनी त्यांच्याबरोबर चर्चा करून 3 महिने परकिय माल न विकण्यावर व्यापाऱ्यांना तयार केले. 10 नोव्हेंबर 1930 ला कॉन्सीलच्या निवडणूकीच्या दिवशी मतदानकेंद्रावर निरोधने केल्यामुळे अनसुयाबाई काळे यांना टाऊन हॉलजवळ अटक करण्यात आली. त्यांना चार महिन्याची साधी शिक्षा व 300 रू दंडाची शिक्षा देण्यात आली. कॉग्रेसने पुन्हा सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू करताच इतर भागाप्रमाणे नागपूरलासुध्दा सरकारने धरपकड सुरू केली. बॅ. अभ्यंकर व सेठ पुनमचंदवर सरकारने 10000 रू दंड लावला. निरोधनाला सुरूवात होते न होते तोच विद्यावती देवडीया, चंद्रभागाबाई पटवर्धन, सुशिलाबाई गाडगीळ यांना अटक करण्यात आली. 10 जानेवारी ला 24 स्वयंसेवक व 6 स्वयंसेविकांना पकडण्यात आले. पुढे वानरसेनेचे प्रमूख प्रभाकर साखरदांडे, बाबासाहेब देशमुख, गंगाबाई चौबे हयांनाही अटक करण्यात आली. 26 जानेवारीला चिटणिसपार्क येथे कार्नोलिया साळके यांनी काही स्वयंसेवकासोबत स्वातंत्र्य दिन साजरा करण्याचा प्रयत्न करताच, त्यांना अटक करण्यात आली. परंतु काही स्वयंसेवकांनी चिटणिसपार्कच्या आत प्रवेश करून पूर्ण स्वातंत्र्याचा ठराव वाचला, म्हणुन पोलीसांनी त्यांचा चोपून काढले 01 फरवरी 1932 रोजी नागपूरच्या महिलांनी धंतोली विभागात एक सभा घेतली. या सभेत 25 महिला उपस्थित होत्या. या सभेत महिलांनी कायदेभंग चळवळीत सहभागी होवुन स्वदेशिचा प्रसार करण्याचा निर्णय घेतला. मे महिन्यात चार स्वयंसेवक स्त्रियांना अटक करण्यात आली. 25 मे 1932 च्या संयुक्त परिषदेच्या झेंडा वंदनाच्या वेळी 8 महिला व 7 पुरूषांना अटक करण्यात आली. यांत गंगाबाई तिडके प्रमुख होत्या. 17जुलैला झालेल्या सभेत रमाबाई तांबे, इंदिराबाई रूईकर आणि गोपिकाबाई पटवर्धन यांनी नविन नियम कसे अन्यायकारक आहे, यावर भाषणे दिली. तर रमाबाई धोटे यांनी स्वदेशीवर भाषण दिले. नागपूरच्या महाराणीने 1932 मध्ये महिला संघटना स्थापन केली. या संघटनेच्या अध्यक्ष इंदिराबाई बनसोड होत्या. महिला संघटना स्थापनेमागे दलित वर्गाच्या लोकांना देण्यात आलेल्या जागांची संख्या वाढावी हा उद्देश होता. 1932 च्या कायदेभंग मोहिमेतच जंगल कायदेभंगाकरीता भिमाबाई जोशी यांना 4 महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली. कमलाबाई जयराम अखोज यांना 6 महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली. तर अंजनाबाई देशमुख यांना 4 महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली. याशिवाय लक्ष्मीबाई कोष्टीला 3 महिने तर यशोधाबाई देशमुख यांना 6 महिने सक्तमजुरीची शिक्षा झाली.[14]

21 फरवरी 1935 ला नागपूरच्या लक्ष्मीबाई चिटनविस यांच्या अध्यक्षतेखाली हिंदु मुलींच्या शाळेत सभा झाली यासभेला 100 महिला उपस्थित होत्या. सभेत रमाबाई तांबे, गोखले वकिलांच्या पत्नी आणि लक्ष्मीबाई चिटनविस यांची भाषणे झाली. जॉईन्ट पॉर्लमेंटरी कमीटीला विरोध हा भाषणाचा विषय होता. पुढे महात्मा गांधी नागपूरला आले असता चिटनविस पार्क येथे अनूसूयाबाई काळे यांच्या अध्यक्षतेखाली 9 हजार पुरूष व 1000 महिलांच्या उपस्थितीत सभा घेण्यात आली. त्यानंतर अनूसुयाबाईंनी अनेक सभांमध्ये अध्यक्षस्थान भूषविले. वैयक्तीक सत्याग्रहात नागपूर मधून विद्यावती देवडीया यांनी सहभाग घेतला. त्याबद्दल त्यांना अटक करण्यात आले. विद्यावती देवडीया यांना 22 आक्टोबर 1942 ला तुरूंगातुन मुक्त करण्यात आले. त्यांच्या स्वागताकरीता पुनमचंद राका आणी धनवंतीबाई राका इ. कॉग्रेसमंडळी उपस्थित होती.[15]

### 1942 च्या 'चलेजाव' चळवळीत नागपूरकर महिनांचे योगदान :

1 ऑगस्ट 1942 रोजी शिवदास डांगाच्या अध्यक्षतेखाली 500 लोकांच्या सभेत रविशंकर शुक्लासोबत विद्यावती देवडीया यांचेही भाषण झाले,त्यात त्या म्हणाल्या ''आजच्या अडचणीच्या परिस्थितीत सगळया जाती धर्माच्या लोकांनी आपली ऐकी कायम ठेवावी.'' 02 ऑगस्टला विद्यावती देवडीया यांनी नागपूरला 50 महिलांची रविशंकर यांच्या घरी सभा घेतली त्यात विद्यावती यांनी महिलांना विनंती केली की, येऊ घातलेल्या लढयात महिलांनी भाग घ्यावा आणि खादी वापरावी.16नागपूरमध्ये 12 ऑगस्ट 1942 च्या स्वातंत्र्यलढयाला खऱ्या अर्थाने सुरूवात झाली. एका बालकाने जिल्हा कचेरीवर राष्ट्रीयध्वज फडकविला त्या ठिकाणी निशस्त्र लोकांवर पोलीसांनी गोळीबार केला. 13, 14, आणि 15 हे 3 दिवस नागपूरच्या इतिहासातील रक्तरंजित क्रांतीचे दिवस ठरले. त्या तिन दिवसात ब्रिटीशांची राजवट जणू नव्हतीच. त्या तीन दिवसात इतवारा पोस्ट ऑफिस लुटण्यात आले. त्यावेळी गंगुबाई बुधे हया महिलेने पोलीसांना मारण्याकरीता लोकांना दगड पुरविले. याशिवाय मातीच्या तेलाच्या बाटल्या घेवुन पुनमचंद रॉका बरोबर जाळपोळीत मदत करायला त्या जात असत व भूमिगतांना जेवन पुरविण्याचे काम करीत. महाल, गांधी दरवाजा, नविन शुक्रवारी, बडकत चौक, इतवारी स्टेशन, इतवारी धान्य बाजार, कॉटन मार्केट चौक, राममंदीरा

जवळ सर्व ठिकाणी लोकांनी शौर्याची शर्थ केली. त्यात कित्येक लोक शहीद झाले, पन्नालाल देवडीया, दिनदयाल गुप्त, वामनराव गावंडे आणि विद्यावती देवडीया यां पुढाऱ्यांना अटक झाल्यानंतर नागपूर शहरातील जनतेने उत्सफुर्त 1942 चा हा लढा चालविला. भूमीगत राहुन लढा सुरू ठेवणाऱ्या लोकांना महिलांनी मदत केली. या ओदोलनात महिलांना मोठे कष्ट सहन करावे लागले.[17]

नागपूरच्या सरलाबाई शिर्केकर पतिला क्रांतिकारक मदत केरीत आसे. त्यांच्याघरीच बॉम्ब बनविण्याचा लहानसा कारखाना असून त्यांची मुलगी सुमती यांनी मुंबईहुन बॉम्ब बनविण्याचे सामान आणले होते. शांताबाई माडखोलकरांचा या क्रांतीकारासी संबंध होता. त्यांच्याकडे मगनलाल बांगडीच्या गुप्त सभा होत असे. निलाबेन, अनसुयाबाई जोशी मिळून क्रांतीकारी कामे करीत असत. सिंधुताई करंदिकर यांनी बॉम्बचे सामान मुंबईला नेऊन दिले त्यांच्याबरोबर पद्मा शेवडे, निर्मला साळवे, प्रभा हरकरे हया क्रांतीकार्यात काम करीत असत. साळुबाई घोरमारे यांचा तेलंखेडी बॉम्ब खटल्यासी संबंध होता. सगळी टोळी पकडली गेली. पण त्या शिताफिने भूमीगत राहील्या राधाबाई अहेर ही महिला क्रांतीकारी गटांना रूळ उखडण्याचे सामान लपवून नेऊन देत असे, कमलाताई हॉस्पेटचे सूतीकागृह भूमीगताचे आश्रय स्थान होते. भूमीगतांना आश्रय देने, त्यांना योग्य स्थळी पोहचविणे, त्यांचे निरोप पोहचविणे त्यांच्या कुटुंबीयांना मदत करणे अशी कामे कमलाताई जातीने लक्ष देवून करीत. उमाबाई फडणविस, सुशिलाबाई मोहीते आणि त्यांचा परिवारही भूमीगताची आश्रयस्थाने होती. वेणूताई यांनी वामणराव गावंडेना तर कुलसुबी याकुब यांनी मगनलाल बागडी यांना गुप्तपणे राहण्यास मदत केली.[18]

नागपूरहुन गेलेल्या डॉ. दुर्गाताई वझलवार व सहकारी महिलांनी चिमुर अत्याचाराला वाचा फोडुन सरकारचे कृत्य, जगासोमर आणले. तर अनसुयाबाई काळे यांनी केलेल्या अथक प्रयत्नांमुळेच चिमूर, आष्टी येथील सप्त चिरंजीवाची फाशीचा शिक्षा रद्द झाली.[19]

### *निष्कर्ष :*

लोकमान्य टिळक व महात्मा गांधी या राष्ट्रीय नेत्यांच्या दौऱ्यांनी व त्यांच्या विचारांनी प्रभावित हाऊन, विदर्भासह, नागपूरातील स्त्रियांनी, भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात सक्रिय सहभाग घेऊन, राष्ट्रीय आंदोलनाला गती देण्याचा प्रयत्न केला. नागपूरातील सर्व जाती धर्माच्या स्त्रियांनी असहकार चळवळ, झेंडा सत्याग्रह, सविनय कायदेभंग आंदोलन, गढवाल दिन, चलेजाव चळवळीत मोठया प्रमाणात सहभाग घेऊन आंदोलनाला सहकार्य केले. नागपूरमधिल क्रांतीकारी विचाराच्या नेत्यांना व इतर कार्यकर्त्यांना नागपूरातील स्त्रियांनी मदत करून, त्यांचे निरोप पोहचविणे आणि काही कार्यकर्त्यांच्या जेवणाची पण व्यवस्था केली. एकंदरीत भारतासह नागपूरातील स्त्रियांनी स्वातंत्र्य लढयात सक्रिय सहभाग घेऊन, स्वातंत्र्य आंदोलनाला गती देण्याचा प्रयत्न केला असला तरी, त्या स्त्रियांची इतिहासात पाहिजे तसी दखल घेण्यात आली नाही. हे मात्र खरे.

### *संदर्भ ग्रंथ :*


1) यशोदाबाई जोशी : आमचा जिवन प्रवास, व्हिनस प्रकाशन पुणे, 1965, पृ.क्र 59
2) दमयंती पाठक : वैदर्भीय महिलांचे स्वातंत्र्य संग्रामातील सहकार्य, मंगेश प्रकाशन नागपूर 2003, पृ.क्र 27
3) कित्ता : पृ.क्र 26, 27
4) सुशिला महाजन : दीपज्योती नमोस्तुते, शिल्पा प्रकाशन पुणे, 1987, पृ.क्र 11
5) दमयंती पाठक : वैदर्भीय महिलांचे स्वातंत्र्य संग्रामातील सहकार्य, मंगेश प्रकाशन नागपूर 2003, पृ.क्र 36
6) जानकीदेवी बजाज : माझी जिवन यात्रा, पॉप्युलर बुक डेपो मुंबई, 1960, पृ.क्र 49
7) दमयंती पाठक : वैदर्भीय महिलांचे स्वातंत्र्य संग्रामातील सहकार्य, मंगेश प्रकाशन नागपूर 2003, पृ.क्र 42, 50
8) कित्ता : पृ.क्र 52, 53
9) K.K. Choudhari : Maharashtra & Indian Freedom struggle, Silver Jubilee Pub. Bobbay, 1985 pg. 76
10) दमयंती पाठक : वैदर्भीय महिलांचे स्वातंत्र्य संग्रामातील सहकार्य, मंगेश प्रकाशन नागपूर 2003, पृ.क्र 54, 55
11) पु.बा. काळे : अनसूयाबाई आणि मी, व्हिनस प्रकाशन पूणे, 1962, पृ.क्र 80
12) दमयंती पाठक : वैदर्भीय महिलांचे स्वातंत्र्य संग्रामातील सहकार्य, मंगेश प्रकाशन नागपूर 2003, पृ.क्र 101, 102
13) सपा.मा.ज. कानेटकर : नागपूर प्रांताचा इतिहास भाग 3, प्र. कॉग्रेस सुवर्ण जयंती नागपूर1935, पृ.क्र 16,17
14) दमयंती पाठक : वैदर्भीय महिलांचे स्वातंत्र्य संग्रामातील सहकार्य, मंगेश प्रकाशन नागपूर 2003, पृ.क्र 107 ते 111
15) कित्ता : पृ.क्र 155, 167
16) कित्ता : पृ.क्र 193
17) शंकरराव गेडाम : स्वातंत्र्य लढयातील नागपूर जिल्हयाचा सहभाग, ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती, मुंबई, 1992 पृ.क्र 58,59
18) ज.रा. जोशी : डॉ. ना.भा. खरे यांचे चरित्र, पृ.क्र. 170
19) पु.बा. काळे : अनसूयाबाई आणि मी, व्हिनस प्रकाशन पुणे, 1962 पृ.क्र. 131